१६ ते ३१ मे २०१५

परिवर्तनाचा

# वाटसरू




## सार्वजनिक उपक्रम :

स्थित्यंतर
व
नवी दिशा



F-1/105 : अस्मितेच्या राजकारणाचा रंगमंचीय आविष्कार



पर्यावरणवादी स्त्रीवादावरची तेमसुला आओंची कविता



चित्रमय स्वगत - प्रभाकर बरवे

# अनुक्रम


## झोत
सार्वजनिक उपक्रम : स्थित्यंतर व नवी दिशा
**मंजूषा मुसमाडे** ५
महाराष्ट्रातील दुष्काळ निर्मूलनाच्या मार्गातील पेच...
**सोमिनाथ घोळवे** ११

## देश
मुस्लिमांचा मताधिकार काढून घ्यावाच...
**बशारत अहमद** १८

## राज्य
गोहत्या बंदी : सावरकर आणि विवेकानंद
**दत्तप्रसाद दाभोळकर** २०

## विशेष लेख
राष्ट्रीयत्वाच्या मार्गावरील
सत्यशोधक : जागृतिकार पाळेकर
**उमेश बगाडे** २२

## कोसळलेले सोव्हिएत मॉडेल (२)
मायकेल लेबोविट्झ यांची प्रस्तावना
स्वैर रूपांतर : **संजीव चांदोरकर** ३३

## झरोका
कॅरोलायना स्प्रिंग... अमेरिकेच्या सरकारी शाळेत!
**श्रीकांत काळोखे** ४३

## साहित्य
पर्यावरणीय स्त्रीवादाची कविता
**प्रवीण घोडेस्वार** ४७

## अनुवादित कविता
समोरा-समोर कवी
अनु. **विजय चोरमारे** ५०

## नाटक परीक्षण
अस्मितेच्या राजकारणाचा रंगमंचीय आविष्कार
**शैलेंद्र खरात** ५३

## चित्रमय भारत
प्रभाकर बरवे
**सुधाकर यादव** ५६

## पुस्तक ओळख
तेंडुलकरांचे कादंबरीलेखन
**दत्ता भगत** ६०

## आदरांजली
बीज अंकुरे अंकुरे...
**नारायण लाळे** ६५


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# पर्यावरणीय स्त्रीवादाची कविता

प्रवीण घोडेस्वार



भारतात पर्यावरण संरक्षण चळवळ साधारणत; १९७३ च्या सुमारास सुरू झाली. चिपको आंदोलन हा या चळवळीचा प्रारंभबिंदू. या चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचाही उत्स्फूर्त सहभाग होता. चळवळीत एकत्र काम करताना स्त्रियांच्या लक्षात आले, की बऱ्याच मुद्द्यांबाबत त्यांच्यात आणि पुरुषांमध्ये मतभिन्नता आहे. विशेषतः नैसर्गिक संसाधनाचा वापर कसा करावा याविषयी पुरुष व स्त्रियांची मते खूप वेगळी असल्याचे जाणवायला लागले. या वेगळेपणातूनच मग स्त्रियांनी आपली वेगळी मोट बांधली. अभ्यासांती स्त्रियांना त्यांचे निसर्गाशी असलेले नाते आणि एकूणच निसर्गाचा मानवी जीवनाशी असलेला सहबंध यांची उकल होऊ लागली. या सर्व घटकांचा, क्रिया-प्रक्रियांचा, अध्ययन, अनुभवांचा परिपाक म्हणून भारतीय पर्यावरणीय स्त्रीवाद या संकल्पनेची मांडणी पुढे आली. वंदना शिवा ह्या यातील अग्रणी.

भारताचा उत्तरपूर्व व ईशान्य प्रांत तसा शांत भूप्रदेश. पण तथाकथित विकासाच्या नावाखाली इथल्या पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याचे मत वंदना शिवा यांनी व्यक्त केले आहे. विकासाच्या नावाखाली हजारो लोकांना बेघर व्हावे लागत आहे. निसर्गावर होणाऱ्या अत्याचारामुळे केवळ पर्यावरणाचे नुकसान होत नसून इथली संस्कृती, इथल्या प्रथा-परंपरा, आदिवासी चालीरीतीदेखील धोक्यात येत आहेत, याचे भान धोरणकर्त्यांना नाही. या सर्व परिस्थितीचे प्रभावी चित्रण उत्तर-पूर्व भारतीय काव्यप्रवाहातून ठळकपणे उमटत आहे. तेमसुला आओ ह्या या काव्यधारेच्या बिनीच्या शिलेदार आहेत. तेमसुला आओ यांच्या कवितेकडे वळण्याआधी त्यांच्याविषयी थोडक्यात जाणून घेऊया.

तेमसुला आओ यांचा जन्म आसाममधल्या जोरहट इथे १९४५ मध्ये झाला. त्यांनी नागालंडमधल्या मोकाकचुंग इथून बी.ए., तर आसामच्या

ईमेल : gpraveen18feb@gmail.com